# सापळा केस

दिनांक ३१/०८/२०२०

**आरोपी लोकसेवक राजकुमार उत्तमचंद शर्मा वय ५१ वर्षे व्यवसाय तलाठी, सज्जा रामेटाकळी रा. सहकार नगर परभणी यांनी १०००/- रू लाच स्विकारले बाबत यशस्वी सापळा कारवाई.**

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि.परभणी येथे दि. १३/०८/२०२० रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, ते मौजे पाहंडुळ ठिकाणाचे राहणार असून मौजे पाहंडुळ येथे एक हेक्टर ४० आर शेती आहे. त्यांनी नमुद शेतीवर सन २०१७ साली पिक कर्ज स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा मानवत तर्फे घेतले होते. सदर कर्ज व त्यावर व्याजाची रक्कम असे मिळुन त्यांचे शेतीचे सातबारावर एकुण १४६०००/- रू एवढा बोजा होता. त्याबाबतची नोंद त्यांचे शेतीचे तीन सातबारावर आहे. त्यानंतर सदर कर्ज हे शासना तर्फे माफ झाले होते. तसे स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा मानवत तर्फे कर्ज निल झाले बाबतचे प्रमाणपत्र त्यांना दि. ०९/०७/२०२० रोजी मिळाले होते. त्यानंतर त्यांना शेतीवर बॅक ऑफ बडोदा येथून नव्याने पिक कर्ज काढायचे आहे. त्यासाठी तेथे पुर्वीचे कर्ज नसलेला कोरा (बोजा नसलेला) सातबाराची आवश्यकता होती. म्हणून ते दि. १२/०८/२०२० रोजी बोजा त्यांचे सातबारावरून कमी करून घेण्यासाठी तलाठी श्री.शर्मा यांचे कडे गेले असता त्यांनी तक्रारदार यांना बोजा कमी करून सातबारा देण्यासाठी प्रत्येक गटाचे सातबारा उता-यासाठी प्रत्येकी ५००/- रू ची मागणी केली व आता काहीतरी द्या असे बोलल्याने तक्रारदार यांनी त्यांना नाईलाजास्तव एकागटाचे ५००/-दिले व उर्वरीत दोन गटाचे १०००/- रू नंतर देतो असे सांगून ते तेथुन निघुन आले त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. वगैरे तक्रार दिली.

त्यानुसार दि १४/०८/२०२० रोजी लाप्रवि परभणी कडुन पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाहीत तक्रारदार यांना आलोसे यांनी त्यांचे तिन सातबारावरील बोजा कमी करून देण्यासाठी उर्वतरीत दोन गटाचे १०००/- रू लाचेची मागणी करून सदर लचेची रक्कम दि. ३१/०८/२०२० रोजी आलोसे राजकुमार उत्तमचंद शर्मा वय ५१ वर्षे व्यवसाय तलाठी, सज्जा रामेटाकळी रा. सहकार नगर परभणी यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम १०००/- रूपये त्यांचे खजगी कार्यालयात स्विकारली आहे. व नमुद आरोपीस स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले आहे. वर नमुद आलोसे यांचे विरूध्द पो. स्टे.मानवत येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड व श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड, श्री.भरत हुंबे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि. परभणी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अमोल कडु, पोह/जहागीरदार, पोह/हनुमंते, पोह/शकील,पोना/अनिल कटारे, पोना/कुलकर्णी, पोना/शेख मुखीद, पोशि/धबडगे, पोशि/मुख्तार, पोशि/चट्टे, मपोशि/सारीका टेहरे, चापोना/कदम, चापोह/चौधरी अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारी विरूध्द करण्यात येणा-या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२-२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्रीमती कल्पना बारवकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड -८८८८८४१९६५
श्री. भरत के. हुंबे, पोलीस उप अधिक्षक - ७०२१००२११०
श्री. अमोल कडु, पोलीस निरीक्षक - ८०८७०७२९१९

Scanned with CamScanner